आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१६ सप्टेंबर २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- हरित ऊर्जेच्या क्षेत्रात जगाचं नेतृत्व करण्यासाठी भारत सज्ज असल्याचं प्रधानमंत्र्यांचं नवीकरणीय उर्जा क्षेत्रातल्या गुंतवणूकदार परिषदेत प्रतिपादन

- गुजरात दौऱ्यात प्रधानमंत्र्यांच्या हस्ते  आज आठ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांची पायाभरणी आणि लोकार्पण

- प्रधानमंत्री आज देशभरातल्या पाच वंदे भारत रेल्वेगाड्यांना दूरस्थ पद्धतीने हिरवा झेंडा दाखवणार / महाराष्ट्रातल्या ३ गाड्यांचा समावेश

- जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्याच्या मतदानासाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस / केंद्रीय गृहमंत्र्यांच्या आज ३ प्रचारसभा

**आणि**

- देशात अनेक ठिकाणी ईदएमिलाद चा उत्साह

**<><><><><>**

हरित ऊर्जेच्या क्षेत्रात जगाचं नेतृत्व करण्यासाठी भारत सज्ज असून याचाच भाग म्हणून सरकारनं २० हजार कोटी रुपयांच्या ग्रीन हायड्रोजन मिशनला सुरुवात केली आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. ते आज गुजरातमधे गांधीनगर इथं आयोजित चौथ्या जागतिक

नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रातल्या गुंतवणूकदारांच्या परिषदेत बोलत होते. केंद्रीय नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने या परिषदेचं आयोजन केलं आहे. या परिषदेला संबोधित करताना प्रधानमंत्र्यांनी भारताने ऊर्जा क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा आढावा घेतला. भारतानं हरित ऊर्जा क्षेत्रात प्रगती साधण्यासाठी अनेक महत्वाचे निर्णय घेतले आहेत. ३१ हजार मेगावॅट जलविद्युत निर्मितीच्या प्रकल्पाचं काम सुरू असून यासाठी १२ हजार कोटी रुपये खर्च येणार असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

सौर ऊर्जा, पवन ऊर्जा यांच्या आधारावर देशाचं भविष्य बांधण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले. यावेळी त्यांनी पीएम सूर्यघर योजनेच्या यशाबद्दल कौतुक केलं. आतापर्यंत देशभरातल्या सव्वा तीन लाख घरांमध्ये सौर पॅनल बसवण्यात आले आहेत. भविष्यात देशातलं प्रत्येक घर ऊर्जा निर्मिती केंद्र होईल. २१ व्या शतकाचा इतिहास लिहिला जाईल तेव्हा भारताच्या सौर क्रांतीचा इतिहास सुवर्ण अक्षरांनी लिहिला जाईल, असं प्रधानमंत्री म्हणाले. सौर पम्पाद्वारे शेतकऱ्याला आत्मनिर्भर बनवण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचंही ते म्हणाले.

देशातल्या गरीब, पीडित, दलित जनतेला सन्मानाचं आयुष्य मिळेल याची खात्री हे सरकार देतं असं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. देशाला तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनवण्यासाठी १४० कोटी देशवासी झोकून देऊन काम करत असून आजची परिषद ही याच ध्येयाचा एक भाग असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. या परिषदेला गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत,

मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू आदी उपस्थित होते.  या परिषदेनंतर प्रधानमंत्री गुजरातमधल्या अहमदाबाद ते गांधीनगर या मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याला हिरवा झेंडा दाखवतील. तसंच अहमदाबाद ते भुज या वंदे भारत मेट्रोच्या उद्घाटनासह ८ हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पांची पायाभरणी करतील. अहमदाबाद ते भुज ही देशातली पहिली वंदे भारत मेट्रो आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज देशभरातल्या पाच वंदे भारत रेल्वेगाड्यांना दूरस्थ पद्धतीनं हिरवा झेंडा दाखवणार आहेत. यात महाराष्ट्रातल्या पुणे-हुबळी, कोल्हापूर-पुणे आणि नागपूर-सिकंदराबाद या तीन रेल्वे गाड्यांचा समावेश आहे. तसंच दुर्ग ते विशाखापट्टणम  आणि आग्रा छावणी  ते वाराणसी या वंदे भारत रेल्वेगाड्यांनाही प्रधानमंत्री आज हिरवा झेंडा दाखवतील. महाराष्ट्रात पुणे-हुबळी आणि कोल्हापूर - पुणे या दोन्ही गाड्या प्रत्येकी तीन दिवस चालणार आहेत. छत्तीसगडमधील दुर्ग ते विशाखापट्टणम ही गाडी गुरुवार वगळता आठवड्यातले सर्व दिवस चालणार आहे.

**<><><><><>**

देशभरात उद्यापासून 'स्वच्छता ही सेवा' अभियानाला सुरूवात होत आहे. हे अभियान गांधी जयंतीपर्यंत म्हणजेच दोन ऑक्टोबर पर्यंत सुरू राहाणार आहे. 'स्वभाव स्वच्छता-संस्कार स्वच्छता' ही यावर्षीच्या अभियानाची मुख्य संकल्पना आहे. या अंतर्गत लोकसहभागातून श्रमदान आणि सामूहिक

कार्याच्या माध्यमातून पर्यटन स्थळं, सार्वजनिक इमारती, व्यावसायिक परिसर, जलाशय, प्राणीसंग्रहालय, अभयारण्य आणि सार्वजनिक स्वच्छतागृह सारख्या ठिकाणी स्वच्छता मोहिम राबवण्यात येणार आहेत. सर्व केंद्रीय तसच राज्य मंत्रालयं लोकसहभागातून विविध योजना राबवणार आहेत. संपूर्ण समाजाचा विचार करण्याचा दृष्टीकोन बाळगून स्वच्छता लक्ष्य विभाग, श्रमदान उपक्रम-स्वच्छतेमध्ये लोकसहभाग आणि स्वच्छतामित्र सुरक्षा शिबिर हे तीन घटक या मोहिमेचे प्रमुख आधारस्तंभ असतील. या अभियानात देशभरातले नागरिक, उद्योग, स्वयंसेवी संस्था, विकास संस्था यांसह विविध स्थानिक स्वराज्य संस्थाना सहभागी करुन घेण्यात येणार आहे.

**<><><><><>**

आठव्या भारत जल सप्ताह २०२४ ची सुरुवात उद्या नवी दिल्लीतल्या भारत मंडपम इथे होणार असून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या कार्यक्रमाचं उद्घाटन करतील. चार दिवसांच्या या कार्यक्रमात ४० देशातले दोनशे प्रतिनिधी सहभागी होतील. या कार्यक्रमात शंभरहून अधिक दालनं आणि जलक्षेत्रातले स्टार्टअप्स आपल्या संकल्पना मांडतील.

**<><><><><>**

जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्याच्या मतदानासाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस आहे. तिसऱ्या टप्प्यातलं मतदान १ ऑक्टोबर रोजी होणार आहे. तिन्ही टप्प्यांची मतमोजणी ८ ऑक्टोबरला होणार आहे. जम्मू काश्मीर निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याचं

मतदान १८ सप्टेंबर रोजी होणार आहे. जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीचा निकाल हरियाणा विधानसभा निकालाबरोबर ८ ऑक्टोबर रोजी घोषित होईल.

<><><><><>

भाजपाचे ज्येष्ठनेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आज जम्मू काश्मीर च्या डोडा जिल्ह्यातल्या तीन निवडणूक प्रचारसभांना संबोधित करणार आहेत. भाजपा उमेदवारांच्या प्रचारासाठी ते रामबन, किश्तवार आणि पद्दार इथं प्रचार करतील.

<><><><><>

देशात अनेक ठिकाणी आज ईद - ए - मिलाद - उन - नबी म्हणजेच प्रेषित मोहम्मद पैगंबरांची जयंती उत्साहात साजरी होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जनतेला त्यानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. प्रेषित मोहम्मद पैगंबरांनी प्रत्येकाला प्रेम आणि बंधुत्वाच्या भावनांना बळ देण्यासाठी प्रेरित केलं, त्यांनी समाजात दया, मानवतेचा प्रसार केला असं राष्ट्रपतींनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

प्रेषित हजरत मोहम्मदांची मानवता आणि बंधुभावाची शिकवण निरंतर जगाला मार्गदर्शन करीत राहील असं उपराष्ट्रपतींनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. या सणाच्या निमित्ताने सर्वत्र आनंद, समृद्धी, एकोपा आणि सामंजस्याचं दर्शन घडावं, अशी शुभेच्छा प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केली आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी ईद ए मिलाद निमित्त शुभेच्छा दिल्या

आहेत. ईद ए मिलाद हा सण त्यांच्या प्रेम, दया आणि त्यागाच्या शिकवणीचे स्मरण करुन देतो, असं राज्यपालांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

गणेश चतुर्थीपासून सुरु झालेल्या गणेशोत्सवाचा उद्या अनंत चतुर्दशीच्या दिवशी समारोप होणार आहे. लाडक्या गणरायाला निरोप देण्यासाठी होणारी भाविकांची गर्दी लक्षात घेऊन विविध ठिकाणी स्थानिक प्रशासन सज्ज झालं आहे.

**बृहन्मुंबई महानगरपालिकेनं** यंदा पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशानं गणेशमूर्तींचं विसर्जन करण्यासाठी २०४ कृत्रिम तलाव तयार केले आहेत. या तलावांची माहिती भाविकांना क्यूआर कोडद्वारे मिळणार आहे.

**पुण्यात** विसर्जन मिरवणुकीच्या अनुषंगानं वाहतुकीत बदल करण्यात आला असून शहरातले महत्त्वाचे रस्ते वाहतुकीसाठी बंद ठेवले जाणार आहेत. इतर वाहतुकीच्या मार्गांमध्येही बदल केले जाणार आहेत.

उद्याची अनंत चतुर्दशी आणि आजच्या ईद-ए-मिलादच्या पार्श्वभूमीवर, मुंबई शहर, मुंबई उपनगर आणि राज्यातल्या इतर काही जिल्ह्यांमध्ये मुस्लिम समाजाने ईदचा जुलूस १८ तारखेला काढायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, विविध देशात गणेशोत्सव कशा रीतीनं साजरा होतो हे आपण तिथे राहणाऱ्या नागरिकांकडून जाणून घेत आहोत. आकाशवाणी मुंबईवरून रात्री ८

वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय बातम्यामध्ये आज आपण जाणून घेणार आहोत, थायलंडमधल्या गणेशोत्सवाविषयी.

**<><><><><>**

अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर काल दुपारी प्राणघातक हल्ला करण्याचा प्रयत्न झाल्यानंतर त्यांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलं आहे. ट्रम्प यांच्या फ्लोरिडा इथल्या गोल्फ कोर्सवर एका संशयित बंदूकधाऱ्याला ताब्यात घेतल्याची माहिती अमेरिकेच्या गुप्तचर यंत्रणेनं दिली आहे.

**<><><><><>**

आज जगभरात ओझोन आवरण दिन साजरा केला जात आहे. दरवर्षी १६ सप्टेंबरला हा दिन साजरा केला जातो. सूर्याच्या घातक किरणांपासून पृथ्वीवरील वातावरणाचं संरक्षण करण्याचं कार्य हे ओझोनचं आवरण करत असतं. सर्वसाधारण जीवनातल्या अनेक रसायनांच्या वापराने ओझोनचं आवरण पातळ होत असल्याचं आढळून आलं आहे. त्याच्या संवर्धनासाठी आज विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून विचारविनिमय करण्यात येतो. यंदाच्या ओझान दिवसाची संकल्पना मॉंट्रियल प्रोटोकॉल जलवायुच्या क्षेत्रात पुढचं पाऊल ही आहे.

**//<><><><><>//**